कदीम ठाणे कदिम जालना सत्यमेव जयते

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** जालना **P.S.(ठाणे):** कदीम -जालना

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0203 **Year (वर्ष):** 2024

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 28/05/2024 21:18

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** मंगलवार **Date From (दिनांक पासून):** 28/05/2024

**Time Period (कालावधी):** पहर 5 **Date To ( दिनांक पर्यंत):** 28/05/2024

**Time From (वेळेपासून):** 14:18 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 14:18 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 28/05/2024 **Time (वेळ):** 20:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 036

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 28/05/2024 21:10 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

उत्तर, 03 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** पंचायत समिती कार्यालय जालनाचे ,परिसरात चहाचे हटेलमध्ये

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** श्रीनाथ अरुण गिराम

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1996

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | राममुर्ती, ताजिजालना ,कदीम -जालना,जालना,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | राममुर्ती, ताजिजालना ,कदीम -जालना,जालना,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9673903831

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | भाऊसाहेब काशिनाथ गिराम रोजगार सेवक | | | 1. राममुर्ती ताजिजालना, ,कदीम -जालना,जालना,महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 2500/ रुपये लाचेची रक्कम न्थ्रासिन पावडर लागलेली | 2,500.00 |

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

2,500.00

**11. Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12. First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

दिनांक 28.05.2024.
फिर्याद

मी श्रीनाथ अरुण गिराम,वय 28 वर्ष,व्यवसाय-शेती, रा.राममुर्ती, ता.जि.जालना मो.क्र. 9673903831 समक्ष अॅन्टी करप्शन ब्युरो जालना येथे हजर राहुन फिर्याद देतो की, मी दिनांक 27.05.2024 रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो जालना येथे तक्रार दिली होती की, मला राममुर्ती शिवारात गट क्र. 180 मध्ये 40 आर जमीन आहे. मला रोजगार हमी योजने अंतर्गत शासनाकडून विहीर मंजुर झालेली असुन सदर योजनेचा मी लाभ धारक आहे. तसेच माझ्याकडे जॉबकार्ड देखील आहे. माझ्या नावावर राममुर्ती शिवारात गट क्र.180 मध्ये असलेल्या जमीनीमध्ये मी शासनाकडून मंजुर झालेल्या विहीरीचे खोदकाम चालु केलेले आहे. मी स्वत: विहीरीवर रोजंदारीने खोदकाम करतो. त्या कामाचे शासनाकडून नियमाप्रमाणे रोजंदारीचे पैसे माझ्या खात्यावर जमा होतात. पहिल्या मस्टर नुसार माझ्या खात्यावर रोजंदारीचे पैसे जमा झाले परंतु दिनांक 05.05.2024 ते दिनांक 11.05.2024 या व दिनांक 12.05.2024 ते दिनांक 18.05.2024 या कालावधीतील मी विहीरीवर केलेल्या कामाचे रोजंदारीचे पैसे माझ्या खात्यात जमा झाले नाही. त्यामुळे मी दिनांक 27.05.2024 रोजी सकाळी साडे नऊ वाजेच्या सुमारास आमच्या गावात जावून रोजगार सेवक भाऊसाहेब काशिनाथ गिराम यांना भेटून त्याबाबत विचारणा केली असता रोजगार सेवक भाऊसाहेब गिराम हे मला म्हणाले की, तुझे रोजंदारीचे पैसे व विहीर खोदकामाचे पैसे काढण्यासाठी विहीर खोदकामाचे मस्टर पंचायत समिती कार्यालय जालना येथे जमा करुन मस्टर ऑनलाईन अपलोड करावे लागते त्यानंतर मस्टर प्रमाणे पैसे आपल्या खात्यावर जमा होतात. तुम्हाला जर विहीरीचे व रोजंदारीचे पैसे काढायचे असेल तर मस्टर काढण्यासाठी इंजिनिअर रत्नपारखे यांना 2000 रुपये व मला 500 रुपये असे दोघांचे मिळून एका मस्टरचे 2500 रुपये प्रमाणे पैसे माझ्याकडे द्या, मी तुमच्या मस्टरचे काम करतो इंजिनिअर रत्नपारखे हे लाभार्थ्याला डायरेक्ट पैसे मागत नाही व घेत पण नाही. इंजिनिअर माझ्या मार्फतच पैसे घेतो, असे म्हणाले. रोजगार सेवक भाऊसाहेब गिराम यांनी मागीतलेले पैसे हे लाचेचे आहे हे मला माहिती असल्याने मी अॅन्टी करप्शन ब्युरो जालना येथे तक्रार देण्यासाठी आलो आहे. मला रोजगार सेवक भाऊसाहेब गिराम यांना पैसे देण्याची इच्छा नाही. त्यांची व माझी वैयक्तिक दुश्मनी नाही किंवा त्यांचा माझा देण्या घेण्याचा कोणताही आर्थिक व्यवहार नाही. तसेच त्यांच्या मध्ये व माझ्यामध्ये कोणत्या ही प्रकारचा वादविवाद झालेला नाही. मी जर त्यांना पैसे दिले नाही तर ते माझे काम करणार नाही. तरी आज दिनांक 27.05.2024 रोजी मला रोजगार सेवक भाऊसाहेब गिराम यांनी मला जालना तहसिल कार्यालया समोर भेटण्यास बोलावले असल्याने मी त्यांना भेटण्यासाठी जाणार आहे. त्यावेळी मी त्यांना पुन्हा माझ्या विहीरीवरील खोदकामाचे मस्टर काढून देण्याविषयी बोलणार आहे. त्यावेळी रोजगार सेवक यांनी मला स्वत: अथवा इतरामार्फत पैशाची मागणी केल्यास त्यांचेवरती कायदेशीर कारवाई करावी. अशा मजकुराची लेखी तक्रार दिली होती.
मी दिलेल्या तक्रारी वरुन अॅन्टी करप्शन ब्युरो जालना येथील पोलीस उप अधीक्षक श्री.किरण बिडवे साहेब यांनी दोन शासकिय पंचाना बोलावुन माझी व पंचाची ओळख करुन देवुन माझी तक्रार त्यांना दाखविली. सदर तक्रारीवर मी, दोन्ही पंचांनी व श्री.बिडवे साहेबांनी सह्या केल्या आहे. त्यानंतर मी रोजगार सेवक भाऊसाहेब गिराम यांचे विरुध्द दिलेली तक्रार खरी आहे काय ? ते माझ्या कडे लाच मागतात काय ? याची खात्री करण्यासाठी श्री.बिडवे साहेब यांनी मला, पंच क्र. 01 श्री. पेरके यांचेसोबत जावून भाऊसाहेब गिराम यांची भेट घेवून लाच मागणी पडताळणी करण्याबाबत सुचना दिल्या. त्यानंतर पोलीस अंमलदार घायवट यांनी व्हाईस रेकॉर्डर मशीन मध्ये एक नविन मेमरी कार्ड टाकुन त्यामध्ये पूर्वीचे कोणतेही संभाषण नसल्याची खात्री करुन दिली. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर मशीन सुरु करुन त्यामध्ये माझे, दोन्ही पंचाचे व श्री.बिडवे साहेबांचे वक्तव्य घेऊन व्हाईस रेकॉर्डर एका कापडी

पिशवीत टाकुन पिशवी माझ्या शर्टाच्या आतुन गळयात अडकवुन दिली. त्यानंतर मी व पंच क्र.1 श्री. पेरके असे आम्ही दोघे माझ्या जवळील कारने ॲन्टी करप्शन ब्यूरो जालना येथून निघून रोजगार सेवक भाऊसाहेब गिराम यांना तहसील कार्यालय समोरील हायवे रोडवरील चहाच्या हॉटेलमध्ये भेटलो. त्याठिकाणी माझी व रोजगार सेवक भाऊसाहेब गिराम यांच्यामध्ये कामा संबंधी बरीच चर्चा झाली आमच्या चर्चे दरम्यान पंच क्र. 01 श्री.पेरके यांचे समक्ष मी भाऊसाहेब गिराम यांना म्हणालो की, एका मस्टरचे किती दयायचे आपल्याला, त्यावर भाऊसाहेब मला म्हणाले की, ते म्हणतो तीन हजार पण अडीच हजार रुपयात ठेवलं आपल, त्यावर मी त्यांना म्हणालो की अडीच हजार हे इंजिनिअरचे हय का नाव काय त्याच, त्यावर भाऊसाहेब म्हणाले की, रत्नापारखे नाव हे त्याच, मला काही नाही मी मस्टर काढतो, मस्टर अपलोड करायला थोडे चारपाचशे रुपये द्यावे लागतील मला, त्यावर मी भाऊसाहेब गिराम यांना म्हणालो की, तीन इक हजार रुपये लागतील का तेंव्हा भाऊसाहेब म्हणाले की, तुम्ही सगळे अडीच बी दिले ...तरी मी त्याहला बोलतो, त्यावर मी त्यांना अडीच हजार रुपये मस्टर प्रमाणे दोन्हीचे मिळून त्यावर भाऊसाहेब गिराम म्हणाले की, ठिक हे.. उद्याच येईल मी असे म्हणाले. त्यानंतर मी व पंच क्र.1 पेरके असे आम्ही दोघे ॲन्टी करप्शन ब्युरो जालना कार्यालयात परत आलो. तेव्हा माझे जवळील व्हाईस रेकॉर्डर पोलीस अंमलदार घायवट यांनी बंद केला. त्यानंतर बिडवे साहेबांनी व्हाईस रेकॉर्डर मध्ये रेकॉर्ड झालेले महत्वाचे संभाषण ऐकले. त्यावरुन रोजगार सेवक भाऊसाहेब काशिनाथ गिराम यांनी दिनांक 27.05.2024 रोजी तहसील कार्यालय समोरील हायवे रोडवरील चहाच्या हॉटेलमध्ये पंच क्र. 01 श्री.पेरके यांचे समक्ष मला रोजगार हमी योजनेअंतर्गत मंजूर झालेल्या विहीरीवर केलेल्या खोदकामाचे मस्टर काढण्यासाठी इंजिनिअर रत्नपारखे यांना देण्यासाठी 2000 रुपये व स्वत:साठी 500 रुपये असे दोघांचे मिळून 2500 रुपंयाची मागणी करुन दिनांक 28.05.2024 रोजी स्वत: स्विकारणार असल्याचे निष्पन्न झाले.

त्यावरुन दिनांक 28.05.2024 रोजी श्री.बिडवे साहेब यांनी रोजगार सेवक भाऊसाहेब गिराम यांचे विरुध्द सापळा लावण्याचे ठरविले. त्यानंतर दिनांक 28.05.2024 रोजी श्री.बिडवे साहेब यांचे सूचने वरुन ॲन्टी करप्शन ब्युरो जालना येथे पोलीस उपअधीक्षक यांच्या कक्षात पोलीस अंमलदार जुंबड यांनी अंथ्रासीन पावडरची व अल्ट्राव्हायलेट लाईटच्या गुणधर्माची माहीती देवुन मला व दोन्ही पंचांना त्याचे प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. रोजगार सेवक भाऊसाहेब गिराम यांना लाच म्हणुन देण्यासाठी माझ्या कडील पाचशे रुपये दराच्या 5 नोटा एकुण 2500/- रुपये रक्कमेला ॲन्थ्रासिन पावडर लावून नोटा माझ्या पॅन्टचे समोरील उजव्या खिशात ठेवल्या. त्यानंतर बिडवे साहेबांनी मला व पंच श्री.पेरके यांना सविस्तर सूचना दिल्या.

त्यामध्ये मला, रोजगार सेवक भाऊसाहेब गिराम यांनी लाचेची रक्कम स्विकारल्या नंतर उजव्या हाताची बाही वर करुन लाचेची रक्कम स्विकारल्याचा इशारा करावा अशी सूचना दिली. त्यानंतर श्री.बिडवे साहेबांचे सांगणे वरुन पोलीस अंमलदार श्री.घायवट यांनी व्हाईस रेकॉर्डर मशीन सुरु केली त्यामध्ये माझे, दोन्ही पंचाचे व बिडवे साहेबांचे वक्तव्य रेकॉर्ड करुन मशीन एका कापडी पिशवीत टाकुन पिशवी माझ्या शर्टाच्या आतुन गळयात अडकवुन दिली. त्यानंतर माझ्या सोबत पंच श्री. पेरके असे आम्हा दोघांना रोजगार सेवक भाऊसाहेब गिराम यांना भेटण्यासाठी ॲन्टी करप्शन ब्युरो कार्यालय जालना येथून पंचायत समिती कार्यालय जालना आवारात पाठवले.

त्यानंतर मी व पंच श्री.पेरके असे आम्ही दोघेजण माझ्या जवळील कारने ॲन्टी करप्शन ब्युरो कार्यालय जालना येथून रवाना होवून पंचायत समिती कार्यालय जालना मेन गेट समोर माझी कार उभी केली. त्यानंतर मी व पंच क्र. 01 श्री. पेरके असे आम्ही दोघे जण पायी चालत पंचायत समिती कार्यालयाचे परिसरात गेलो. माझ्या पाठीमागे बिडवे साहेब व पंच क्र.2 श्री. वाघ असे बिडवे साहेबांचे खाजगी वाहनात बसुन व सापळा पथक हे त्यांचे जवळील मोटार सायकलने त्याठिकाणी आले आजुबाजूला सापळा लावून थांबले.

तेंव्हा मी माझ्या मोबाईल फोन वरुन भाऊसाहेब गिराम यांना कॉल केला असता ते पंचायत समिती कार्यालयातून बाहेर आले त्यानंतर मी, भाऊसाहेब गिराम व पंच क्र. 01 श्री. पेरके असे आम्ही सोबत पंचायत समिती कार्यालयाचे परिसरातील चहाच्या हॉटेलमध्ये जावून बसलो. त्याठिकाणी पंच क्र. 01 श्री. पेकरे यांचे समक्ष रोजगार सेवक भाऊसाहेब गिराम व माझ्या मध्ये कामासंबंधी बरीच चर्चा झाली तेंव्हा भाऊसाहेब गिराम हे मला म्हणाले की, पैसे आणले का, दे बापा काय देयाचं, असे म्हणाल्याने मी माझ्या उजव्या हाताने पॅन्टच्या समोरील उजव्या खिश्यातुन ॲन्थ्रासिन पावडर लावलेले लाचेचे 2500/- रुपये काढुन भाऊसाहेब गिराम यांचेकडे दिले असता त्यांनी त्यांचे उजव्या हाताने लाचेची रक्कम घेवून त्यांच्या अंगातील पॅन्टच्या उजव्या बाजूच्या पाठीमागील खिश्यात ठेवले व मला म्हणाला की, पंचवीशे हे का, त्यावेळी मी त्यांना हा पंचविशे असे म्हणालो असता ठिक हे, त्याला देवून टाकतो असे म्हणाला तेंव्हा मी त्यांना तुमचे किती हे त्याच्यात असे विचारले असता त्यांनी मला पाचशे, तुमच सॉल करुन टाकतो असे म्हणाला त्यावेळी आमच्यात चर्चा चालु असतांना मी ठरल्या प्रमाणे लाचेची रक्कम स्विकारल्याचा पूर्वनियोजित इशारा केला. ती वेळ अंदाजे दुपारची 02.18 वाजेची होती.

त्यानंतर सापळा पथक सक्रीय होवून पंच क्रं.2 श्री.वाघ यांचे सह त्या ठिकाणी आले. पोलीस उपअधीक्षक श्री.बिडवे साहेब यांच्या सूचने वरुन पोलीस अंमलदार घायवट यांनी माझ्या कडील व्हाईस रेकॉर्डर मशीन ताब्यात घेऊन बंद केली. त्यानंतर श्री.बिडवे साहेबांनी पंच क्र.1 श्री.पेरके यांना लाचेची रक्कम कोणी मागितली व कोणी स्विकारली असे विचारले असता पंच क्र.1 श्री.पेरके यांनी भाऊसाहेब गिराम यांचेकडे बोट करुन यांनीच तक्रारदार श्रीनाथ गिराम यांच्या कडुन उजव्या हाताने लाचेची रक्कम स्विकारुन त्यांच्या अंगातील पॅन्टच्या उजव्या बाजूच्या पाठीमागच्या खिश्यात ठेवली आहे असे सांगितल्याने भाऊसाहेब गिराम यांना पंचा समक्ष लाचेच्या रकमेसह जागेवर पकडले.

त्यानंतर बिडवे साहेबांनी त्यांची, पंचाची व सापळा पथकाची ओळख करुन दिली. त्यानंतर भाऊसाहेब गिराम यांना त्यांचे नाव गाव पत्ता विचारले असता त्यांनी त्यांचे नाव भाऊसाहेब काशिनाथ गिराम वय 47 वर्ष, व्यवसाय नोकरी रोजगार सेवक- ग्रामपंचायत कार्यालय राममुर्ती, रा. राममुर्ती, ता. जि.जालना असे सांगीतले. त्यानंतर श्री.बिडवे साहेब यांचे सूचने वरुन पंच क्र.2 श्री. वाघ यांनी भाऊसाहेब गिराम यांच्या अंगातील पॅन्टच्या उजव्या बाजूच्या पाठीमागच्या खिश्यातुन लाचेचे 2500/- रुपये काढुन घेवुन सदर नोटांचे क्रमांक व सापळापुर्व पंचनाम्यातील नोटांचे क्रमांक एकच असल्याची खात्री केली.

त्यानंतर बिडवे साहेबांच्या खाजगी कारमध्ये काळया कपडयाच्या सहायाने अंधार करुन अल्ट्राव्हायलेट लाईटच्या सहायाने भाऊसाहेब गिराम याचे दोन्ही हात, पॅन्टचा खिसा व लाचेच्या नोटा चेक केल्या असता भाऊसाहेब गोरे यांचे उजव्या हाताचे बोटावर, पॅन्टच्या उजव्या बाजूच्या पाठीमागच्या खिश्याच्या तोंडावर व आतमध्ये तसेच लाचेच्या नोटावर ठिक ठिकाणी हिरवट रंगाची चकाकी दिसुन आली. त्यानंतर सदर 2500/-रुपये लाचेची रक्कम जप्त करण्यात आली. त्यानंतर सापळा पथकाने भाऊसाहेब गिराम यांना ताब्यात घेऊन ॲन्टी करप्शन ब्युरो जालना कार्यालयात आणले व सविस्तर पंचनामा केला. करीता भाऊसाहेब गिराम यांचे विरुध्द कायदेशीर कारवाई करावी ही विनंती.

मी दिलेली फिर्याद माझे सांगणे प्रमाणे संगणकावर टंकलीखीत केली असुन त्याची प्रिंट काढुन मी वाचुन पाहिली. ती माझे सांगणे प्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष ही फिर्याद दिली सही

( किरण बिडवे )
पोलीस उपअधीक्षक
ॲन्टी करप्शन ब्युरो जालना.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

sidharth jabaji mane(I (Inspector)) / **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):** **No.(क्र.):**

**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

(4) **Transferred to P.S.**
**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**
**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

15.**Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**Signature of Officer in charge, Police Station:**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

पोलीस ठाणे अमलदार
कदिम जालना

**Name (नाव):** sidharth jabaji mane
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):**